साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५
020-25538041 ते 44, Ext.no.317 commsugarvikas@gmail.com

जा.क्र.साआ/विकास/ गा.हं. २०२५-२६/ परीपत्रक/५२३/२०२५ दि.२९/०८/२०२५

# परिपत्रक

**विषय :- गळीत हंगाम २०२५-२६ करीता साखर कारखान्यांसाठी गाळप परवाना ऑनलाईन अर्ज करणेबाबत सुचना..**

गाळप हंगाम २०२४-२५ च्या ऊस गाळप हंगामाचा आढावा आणि सन २०२५-२६ मधील गाळप हंगामाचे धोरण मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील मा. मंत्री समितीची बैठकीत निश्चित होईल. सदर बैठकीत धोरण निश्चित झालेनंतर गाळप हंगाम २०२५-२६ सुरु करण्याचा दिनांक सर्व साखर कारखान्यांना कळविणेत येईल. गाळप हंगाम २०२५-२६ करिता साखर कारखान्यांनी ऑनलाईन गाळप परवाना अर्ज सादर करणे करिता खालीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यात येत आहे.

**अ. गाळप परवान्यासंबंधीत कायदेशीर तरतूद -**

१. केंद्र शासनाचे अत्यावश्यक वस्तु कायदा (Essential Commodities Act) १९५५ मधील खंड ३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानूसार ऊस नियंत्रण आदेश, १९६६ पारित केलेला आहे.

२. ऊस नियंत्रण आदेशातील कलम ७ नुसार केंद्र शासनास कारखान्यांना ऊस गाळपास, खांडसरी प्रकल्पास परवाना देण्याचे व ऊस खरेदी नियमन करण्याचे अधिकार आहेत. यामध्ये केंद्र शासनाचे आदेशाव्दारे परवाना दिल्याशिवाय साखर कारखाने, साखर उत्पादकांच्या संस्था किंवा खांडसरी युनिट चालविता येणार नाही अशी तरतुद आहे.

३. राज्य शासनाचे महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण आणि गाळप व ऊस पुरवठा नियम) आदेश, १९८४ खंड ४ मधील तरतुदीनुसार

(i) साखर कारखान्यांना परवाना अधिकारी यांनी गाळप परवाना दिल्याशिवाय साखर उत्पादन करता येणार नाही.

(ii) प्रत्येक गाळप हंगामाकरिता स्वतंत्र गाळप परवाना देणे आवश्यक आहे.

(iii) साखर कारखान्यांनी यावर्षी दि. ३० सप्टेंबर,२०२५ पर्यत गाळप परवाना अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(iv) खंड-४ मधील उपखंड-२ मध्ये शासनाने १४ ऑक्टोंबर, २०१५ रोजी गाळप परवाना फी, सुरक्षा अनामत व दंडाच्या रकमेत सुधारणा करण्याची अधिसूचना पारित केलेली आहे. त्यानुसार कारखान्याने गाळप परवाना फी व सुरक्षा अनामत रक्कम भरणा करावयाची आहे.

ब. गाळप परवाना देणेबाबतचा कालबध्द कार्यक्रम:

| अ.क्र. | कार्यपध्दती | कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | १ सप्टेंबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२५ |
| २ | विशेष लेखापरिक्षक यांचे स्तरावरील छाननी | कारखान्याने अर्ज सादर केल्यानंतर २ दिवस |
| ३ | प्रादेशिक सहसंचालक साखर यांचे स्तरावरील छाननी | ३ दिवस |
| ४ | अर्थ शाखा साखर आयुक्तालय स्तरावर छाननी | ३ दिवस |
| ५ | विकास शाखा साखर आयुक्तालय स्तरावर छाननी | २ दिवस |
| ६ | प्रशासन शाखा साखर आयुक्तालय स्तरावर छाननी | २ दिवस |
| ७ | साखर आयुक्त स्तर | २ दिवस |

**क. ऑनलाईन गाळप परवाना अर्ज करण्याची कार्यपध्दती: -**

१. गाळप परवाना प्रस्ताव ऑनलाईन भरणा करण्यासाठी कारखान्यांनी लॉगईन आयडी व पासवर्ड वापरुन (http://crushinglic.mahasugar.co.in/login.aspx) या वेबसाईटवर आपला ऑनलाईन गाळप परवाना अर्ज दिनांक १ सप्टेंबर, २०२५ पासून सादर करावा. माहिती भरण्याबाबतची कार्यप्रणाली यापुर्वीच सर्व कारखान्यांना पाठविण्यात आलेली आहे.

**२. ऑनलाईन गाळप परवाना अर्ज सादर करताना खालीलप्रमाणे शुल्क भरणा करावे.**

२.१ गाळप परवाना फी महाराष्ट्र शासनाचे "GRAS" प्रणाली मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या लेखाशिर्षामध्ये भरणा करावी. भरणा केलेल्या रक्कमेची पावती PDF फॉर्ममध्ये ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करावी.

- **गाळप परवाना फी भरणेकरिता लेखाशिर्ष - 0425 - सहकार, 800 -** इतर जमा रक्कमा, **(01) (20)** लायसेन्स फी **(0425 0232 01)**

  **गाळप सुरक्षा अनामत रक्कम भरणेकरिता लेखाशिर्ष - 8443 -** सिव्हील डिपॉझिट **103 (00) (01)** सिक्युरिटी डिपॉझिट **(8443 5029 01)** या लेखाशिर्षामध्ये भरणा करावी. भरणा केलेल्या रक्कमेची पावती PDF फॉर्ममध्ये ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करावी.

२.२ **मुख्यमंत्री सहाय्यता निधी व साखर संकुल निधी-** भरणा करण्यासाठी कारखान्यांना ऑनलाईन गेटवे करुन दिलेला आहे. सदर लिंकव्दारे कारखान्यांनी Net Banking /Credit Card /Debit Card /RTGS/ NEFT मार्फत भरणा करावयाच्या निधी रक्कमा दि. २३ सप्टेंबर, २०२४ रोजीचे मा. मंत्री समितीच्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे आहेत.

**मुख्यमंत्री सहाय्यता निधी - हंगाम २०२४-२५ मधील ऊस गाळपावर** रु.5/- (रूपये पाच) प्रतिटन प्रमाणे RTGS / NEFT / IMPS द्वारे भरणा करावा. (मुख्यमंत्री सहाय्यता निधी स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, मुंबई खाते क्र.10972433751, IFSC CODE: SBIN0000300)

**साखर संकुल निधी हंगाम - २०२४-२५ मधील ऊस गाळपावर** रु. 0.50/- (पन्नास पैसे) प्रति टनाप्रमाणे साखर संकुल वटणावळ निधी या नावाने RTGS / NEFT / IMPS द्वारे भरणा करावा. (साखर संकुल निधी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे खाते क्र. 34971605771, IFSC CODE: SBIN0007339).

**२.३ थकीत शासकीय भागभांडवल, कर्ज व हमीशुल्क रक्कमा-** संबंधीत सहकारी साखर कारखान्यांनी शासन निर्णयानुसार निश्चित करून दिलेल्या वेळेपुर्वी शासकीय भागभांडवल, कर्ज व हमीशुल्क रकमा भरणा कराव्यात. थकीत शासकीय भागभांडवल, कर्ज व हमीशुल्क भरणा करणेचा कालवद्ध कार्यक्रम करून त्याप्रमाणे शासकीय येणे रकमा भरणा करणे संबंधीत सहकारी साखर कारखान्यांना बंधनकारक राहील. सहकारी साखर कारखान्यांनी शासकीय भाग भांडवल, कर्ज व हमी शुल्क वसुलीसाठी प्रचलित पद्धतीप्रमाणे साखरेवर टॅगिंगद्वारे शासकीय वसुली रु. ५०/- प्रतिक्विंटल / रु. २५/- प्रतिक्विंटल प्रमाणे साखर विक्रीच्या रकमेतून वसूल करून शासकीय कोषागार जमा करावी.

**२.४ शेतकऱ्यांना अदा करावयाच्या रक्कमा-**कारखान्याने शेतकऱ्यांना मागील हंगामातील संपुर्ण (१०० %) ऊस बील (FRP) अदा केलेली असली पाहिजे.

**३. हंगाम २०२५-२६ करिता कारखान्याकडे नोंदणी झालेले ऊस क्षेत्र माहिती**

कारखान्याकडे नोंदणी झालेल्या ऊस क्षेत्राची माहिती परिशिष्ट क्र. २ (अ) (ब) (क) (ड) मध्ये Excel Sheet वर Unicode Font मध्ये भरणा करून गाळप परवाना वेबसाईटवर अपलोड करावी.

**४. इतर आवश्यक कागदपत्रे**

४.१- प्रदुपण नियंत्रण मंडळाचे वैध Consent to operate प्रमाणपत्राची सत्यप्रत PDF फॉर्ममध्ये ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करावी.

४.२- जे कारखाने भाडेतत्त्वावर / भागिदारी तत्त्वावर गाळप हंगाम घेणार आहेत अशा कारखान्यांनी झालेला नोंदणीकृत करार व त्यास मिळालेल्या शासन / साखर आयुक्तालयाच्या मान्यतेची प्रत व करारातील अटी शर्तीनुसार केलेल्या कार्यपूर्तता अहवाल कागदपत्रांसह सादर करावा.

४.३- नव्याने चाचणी हंगाम घेणाऱ्या सहकारी/खाजगी साखर कारखान्यांनी केंद्र शासनाकडील Plant Code Number आणि प्रदूपण नियंत्रण मंडळाचा दाखला वैध consent to operate PDF फॉर्ममध्ये ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करावी.

४.४- प्रत्यक्ष गाळप क्षमतेएवढा IEM ची प्रत PDF फॉर्ममध्ये ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करणे बंधनकारक आहे.

**(ड) गाळप हंगाम २०२५-२६ च्या अनुषंगाने सर्वसाधारण सुचना:**

१. हंगाम २०२५-२६ करिता सर्व सहकारी/खाजगी साखर कारखान्यांनी गाळप परवाना प्राप्त करुन घेतल्याशिवाय गाळप हंगाम सुरु करू नये.

२. महाराष्ट्र साखर कारखाने ( क्षेत्र आरक्षण, ऊस गाळप आणि वितरण नियमन ) आदेश, १९८४ व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या दुरुस्ती नुसार अद्ययावत तरतूदी व गाळप हंगाम २०२५-२६ करिता मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखालील होणा-या मंत्री समितीतील निर्णय चालूवर्षीच्या गाळप हंगामाकरिता लागू राहतील.

३. ऑनलाइन गाळप परवाना अर्ज विहित मुदतीत सादर न करणे, गाळप परवाना प्राप्त करुन न घेताच गाळप सुरु करणे तसेच गाळप परवान्यातील अटींचे पालन न करणे याबाबत महाराष्ट्र साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण, ऊस गाळप आणि वितरण नियमन) आदेश, १९८४ व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या दुरुस्तीनुसार कारवाई करण्यात येईल.

४. अतिरिक्त ऊस उपलब्धता असल्यास साखर कारखाना साखर आयुक्तांचे पूर्व परवानगी शिवाय बंद करु नये. गाळप सुरु केल्यानंतर येणाऱ्या अडीअडचणींचे निराकरण संबंधीत प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी वेळोवेळी करावे.

५. कोणत्याही परिस्थितीत शेतक-यांना ऊस देयक रोख स्वरुपात (काटा पेमेंट) अदा करू नये. **शेतक-यांच्या बॅक खात्यावरच ऊस देयक रक्कम जमा करावी**. कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील बिगर सभासदांना ऊसदर समान देण्यात यावा. कार्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांनाही शासनाचे धोरणानुसार ऊसाचा दर देणे बंधनकारक राहील.

६. गाळप हंगामातील दररोजचा गाळपाचा अहवाल साखर आयुक्तालयाने ठरवून दिल्याप्रमाणे सर्व साखर कारखान्यांनी सुट्टीच्या दिवशी सुध्दा ऑनलाइन प्रणालीमध्ये भरणे अनिवार्य राहील. त्याकरीता निश्चित व्यक्तिवर जबाबदारी सोपवावी. त्यांचे नाव व भ्रमण दुरध्वनी क्रमांक कार्यकारी संचालकाच्या स्वाक्षरीने प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचेकडे व सहसंचालक (विकास) यांचेकडे सादर करावा.

७. ऊस देयक अदा केलेचा पाक्षिक अहवाल साखर आयुक्तालयास व प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांना नियमित सादर करावा. इतर आवश्यक ती सर्व माहिती प्रादेशिक सहसंचालक (साखर) व या कार्यालयाचे मागणीनुसार वेळेत सादर करावी.

**८. ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे खंड ९ नुसार व महाराष्ट्र साखर कारखाने ( क्षेत्र आरक्षण, ऊस गाळप आणि वितरण नियमन ) आदेश, १९८४ चे खंड १३ नुसार सर्व साखर कारखान्यांना साखर आयुक्त यांनी किंवा अधिनस्त अधिकारी यांनी मागणी केलेले अहवाल, माहिती सादर करणे, बैठकांना हजर राहणे बंधनकारक राहील.**

९. हंगाम २०२५-२६ चे गाळपासाठी शेतक-यांनी नोंद केलेल्या सर्व ऊसाची नोंदणी (http://crushinglic.mahasugar.co.in/login.aspx या वेबसाईटवर अपलोड करण्याची व त्यानूसार गाळप करण्याची जबाबदारी संबंधीत साखर कारखान्यांची राहील.

१०. सर्व कारखान्यांनी गाळप हंगाम २०२५-२६ करीता ऊस नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची यादी साखर आयुक्तालयामार्फत विकसीत करण्यात आलेल्या "**महा-ऊस नोंदणी**" ॲप मध्ये ऑनलाईन अपलोड करावी.

११. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई यांनी ऊस तोडणी कामगारांना यापुर्वी लागू केलेली पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील ऊस तोडणी व वाहतुक शेतमजुर सुरक्षा विमा योजना प्रमाणे गाळप हंगाम २०२५-२६ करिता लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस

तोडणी कामगार कल्याण महामंडळामार्फत ऊस तोडणी कामगारांसाठी विमा योजना कार्यान्वित झाल्यास सर्व सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना सदर विमा योजनेची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहिल.

१२. गाळप हंगामात कारखाना परिसरात वास्तव्यास येणाऱ्या ऊस तोडणी कामगारांकरीता, महिला कामगारांकरीता व विशेपत: बालकांकरीता स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छता गृहे व इतर प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. ज्या ठिकाणी कायमस्वरुपी स्वच्छता गृह बांधणे शक्य नसेल त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाची स्वच्छता गृहांची / फिरत्या स्वच्छता गृहांची व्यवस्था करावी.

१३. ऊस तोड व वाहतूक कामगार यांची आरोग्य तपासणीसाठी तसेच विविध लसीकरण उपक्रमासाठी राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या मदतीने आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करावीत. तसेच कारखाना स्थळावर वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

१४. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ऊस तोडणी मजूर / मुकादम तसेच कारखान्याचे कर्मचारी यांचेकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी शेतक-यांकडून या कार्यालयास प्राप्त होत असतात. अशा स्वरुपाच्या तक्रारी चालू गाळप हंगामात येऊ नयेत म्हणून सर्व साखर कारखान्यांनी तक्रार निवारण अधिकारी म्हणून शेती अधिकारी यांची नेमणूक करावी.

१५. सू-मोटो रिट याचिका क्र.१/२०२३ च्या अनुपंगाने ॲमिकस क्युरी यांनी दिलेल्या निर्देशांचे अंमलबजावणी करणेकरीता या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ०३/०७/२०२५ अन्वये दिलेल्या सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

१६. सर्व सहकारी व खाजगी कारखान्यांना केंद्र शासनाच्या National Single Window System (NSWS) पोर्टलवर नोंदणी करणे व पोर्टलवर आवश्यक माहीती भरणे बंधनकारक राहील.

१७. सर्व गाळप परवानाधारक साखर कारखान्यांनी (आसवणी प्रकल्प असलेले आणि नसलेले सहकारी व खाजगी कारखाने) साखर आयुक्तालयाच्या RT 7(C) MAHA (Diversion of Sugar) प्रणालीमध्ये माहिती भरणे आवश्यक आहे.

१८. कारखान्यास प्राप्त कोणतेही शासकीय अनुदान वाटप करताना प्रथम प्राधान्याने थकीत वेतनाबाबतचे नियोजन व वेतन अदा करणेबाबतचे संभाव्य वेळापत्रक याबाबत माहिती दयावी.

१९. कारखाना भाडेतत्वावर घेतला असल्यास भाडे कराराप्रमाणे भाडयाची रक्कम दिलेबाबत अहवाल वेळोवेळी या कार्यालयास कळवावा.

२०. गाळप हंगाम २०२३-२४ अथवा त्यापूर्वीची ऊस पुरवठादारांना देय असणारी (RSF - Revenue Sharing Formula) रक्कम संपूर्णतः अदा केल्याबाबतचे संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे कार्यालयीन पत्र गळीत हंगाम २०२५-२६ च्या गाळप परवाना मागणी प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य असेल.

२१. गाळप हंगाम २०२४-२५ पर्यंतची (RSF - Revenue Sharing Formula) ची ऑनलाईन सादर करावयाची माहिती त्यासोबतच्या नमूद कागदपत्रांसह ऑनलाईन परिपूर्ण सादर केल्याचे, त्यामध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करणे आणि त्या माहितीची धारीका साखर आयुक्तालयास विहीत मुदतीमध्ये सादर करणे अनिवार्य असेल.

२२. "राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत खेळते भांडवल आणि भांडवली खर्चासाठी कर्ज" या योजनेंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त झालेल्या सहकारी साखर कारखान्यांनी प्राप्त अर्थसहाय्याचा विनियोग दाखला (UC - Utilisation Certificate) सादर करणे अनिवार्य असेल. अपूर्ण विनियोगाची माहिती ही विनियोग दाखला म्हणून ग्राहय धरली जाणार नाही.

२३. "राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत खेळते भांडवल आणि भांडवली खर्चासाठी कर्ज" या योजनेंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त झालेल्या सहकारी साखर कारखान्यांनी प्राप्त अर्थसहाय्याच्या रकमेचा बोजा त्यांचे सहकारी साखर कारखान्याचे स्थावर मालमत्तेवर चढवून त्याबाबतचे अदयावत महसूली अभिलेख ७/१२ उतारा गाळप परवाना मागणी प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य असेल.

२४. "राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत खेळते भांडवल आणि भांडवली खर्चासाठी कर्ज" या योजनेंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त झालेल्या सहकारी साखर कारखान्यांनी मार्च २०२५ अखेर शासन निर्णयापासून देय असणारी व्याजाची / मुददलाची संपूर्ण रक्कम शासकीय कोपागारामध्ये भरणा करणे अनिवार्य असेल. सदरची संपूर्ण देय रक्कम शासकीय कोपागारामध्ये जमा केल्याबाबतचे प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे प्रमाणपत्र गाळप परवाना मागणी प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य असेल.

Digitally signed by
Sidharam Karbasayya Salimath
Date: 29-08-2025 11:24:16

(सिध्दाराम सालीमठ)
आयुक्त (साखर)

प्रति :

१. कार्यकारी संचालक, सहकारी साखर कारखाना... (सर्व)
२. जनरल मॅनेजर, खाजगी साखर कारखाना... ( सर्व)
३. प्रादेशिक सहसंचालक ( साखर )... ( सर्व ) विभाग
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या., साखर भवन, ११ वा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई- २१
५. कार्यकारी संचालक, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन, पुणे.

प्रत: माहितीस्तव सविनय सादर.
मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२